PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Kalat Nakalat
Year: 1989

Song: Nakavarchya Ragala Aushadh
Lyricist: Sudhir Moghe

नाकावरच्या रागाला औषधं काय
गालावरच्या फुग्यांचं म्हणणं तरी काय
नाकावरच्या रागाला औषधं काय
गालावरच्या फुग्यांचं म्हणणं तरी काय
माझी लाडुली गं माझी गोडुली गं
सांगा आमच्या छकुलीला
झालं तरी काय
नाकावरच्या रागाला औषधं काय
गालावरच्या फुग्यांचं म्हणणं तरी काय
त्याचं काय झालं
एक होती मुलगी
एकदा किनई ती जाम रूसली
जाम रूसली जाम रूसली
कोपऱ्यात जाऊन बसली
काही केल्या हसेना
कुणाशी बोलेना
काही केल्या हसेना
कुणाशी बोलेना
साऱ्या घराला असं झालं की
साऱ्या घराला असं झालं की
दे माय धरणी ठाय
नाकावरच्या रागाला औषधं काय
गालावरच्या फुग्यांचं म्हणणं तरी काय
रम पम् रम पम् रम पम् रम पम्
रतार रतार रतारा रा...
मग तिला समजावयला
कोण कोण आलं माहित्ये
आधी आलं अस्वल
बसलं मारून फतकल

आधी आलं अस्वल
बसलं मारून फतकल
कारण त्याच्या लक्षात आलं
कारण त्याच्या लक्षात आलं
त्याच्या चड्डीचं तुटलंय बक्कल
त्याच्या चड्डीचं तुटलंय बक्कल
त्याच्या चड्डीचं तुटलंय बक्कल
त्याच्या चड्डीचं तुटलंय बक्कल
मग आला ससा
मग आला ससा
पांढऱ्या शुभ्र लोकरीचा
गुंडा जसा म्हणतो कसा
बघा बघा मी तिला हसवतो कसा
हे हे हे हे हा हा....
पणं झालं काय माहित्ये
गेला रडत रडत
स्वतःच ढसा ढसा
माकडोबा आले उडया मारीत टणाटणा
माकडोबा आले उडया मारीत टणाटणा
टिवल्या बावल्या केल्या
टिवल्या बावल्या केल्या
पण त्यांची ही दैना झाली दैना
टिवल्या बावल्या केल्या
पण त्यांची ही दैना झाली दैना
एकूण काय कुणाचाच
काही चालेना उपाय
एकूण काय कुणाचाच
काही चालेना उपाय
चालेना हां चालेना हा

Literacy for a Billion

चालेना उपाय
चालेना हां चालेना हा
चालेना उपाय
मग आला मामा
उंदीरमामा अं हं
मग चांदोमामा
नाही रे
गोकुळ मामा
त्याचा काही न्याराच छंद
पाहून सारा राग रंग
तो म्हणतो कसा
मंडळी हो ऐका सांगतो
गोष्ट दोन मुलांची
मंडळी हो ऐका सांगतो
गोष्ट दोन मुलांची
पांडूची बंडूची पांडू आणि बंडूची
पांडूची बंडूची पांडू आणि बंडूची
पांडू आणि बंडू
दोन होती मुलं
एक होतं शहाणं
एक होतं खुळं
पांडू आणि बंडू
दोन होती मुलं
एक होतं शहाणं
एक होतं खुळं
पांडू होता हुशार
बंडू होता मठ्ठ
पांडू ऐके आईचं
बंडू करी हट्ट
पांडू होता पठ्ठया
बंडू होता रडया
पांडू खाई पेढे
बंडू खाई छडया
आई आई आई आई आई आई आई
पांडू होता गुणी
बंडू होता हुज्ज
पांडू होता गुणी
बंडू होता हुज्ज
मी आहे पांडू
आणि बंडू कोण
तूच तूच तूच
तूच तूच तूच तूच तूच तूच
अरे अरे ही पोरगी बोलली की
आणि हसली सुदधा
नाकावरच्या रागाला औषधं काय
लल्ला लल्ला ल ला ला ला
नाकावरच्या रागाला औषधं काय
लल्ला लल्ला ल ला ला ला
नाकावरच्या रागाला औषधं काय
गालांचा खवा नि ओठांची साय
गालांचा खवा नि ओठांची साय
गालांचा खवा नि ओठांची साय

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*